# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MERC

केंद्र क्र.१ ३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५

**दूरध्वनी** २२१६ ३९६४/२२१६ ३९६५ **फॅक्स:** ०२२-२२१६३९७६

**ई-मेल :** mercindia@merc.gov.in **वेबसाईट** www.merc.gov.in


**जाहिरात क्र. ०५/२०२१-२२**

**प्रकरण क्र. १/एसएम/२०२२** **जाहीर सूचना** **३० मार्च, २०२२**

## आर्थिक वर्ष २०२२-२३ करिता नूतनशील ऊर्जेच्या दराबाबत आयोगाने स्वत:हून तयार केलेल्या प्रारुप आदेशावर सुनावणी

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१९ मधील विनियम ८ ला अनुसरुन, महाराष्ट्रातील नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानांकरिता आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी सामान्य (जेनेरिक) वीज दराच्या निश्चितीकरणासाठी आयोगाने स्वत: पुढाकार घेऊन प्रारुप आदेश तयार केला असून तो आयोगाच्या www.merc.gov.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

२. याशिवाय, विनियम ४६ आणि ५६ नुसार, आयोगाने, महाराष्ट्र राज्यातील बायोमास आणि ऊसाच्या चिपाडांची उपलब्धता आणि त्याची किंमत निश्चित करण्यासाठी द एनर्जी अॅण्ड रिसोर्स इन्स्टिट्युट (TERI) मार्फत स्वतंत्र अभ्यास संस्थापित केला होता. (TERI) ने त्यांचा अहवाल सादर केला आहे. बायोमास आणि ऊसाच्या चिपाडांवर आधारित सह-निर्मिती प्रकल्पांसाठी अस्थिर आकारांच्या निश्चितीकरणासाठी या अहवालातील निष्कर्षांचा उपयोग करण्यात आला आहे.प्रारुप आदेशासोबत सदर अहवाल सहपत्र म्हणून जोडण्यात आला आहे.

३. आयोग, सदर प्रारुप आदेश आणि (TERI) च्या अहवालावर याद्वारे जनतेकडून हरकती व सूचना मागवित असून त्या कृपया सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १,जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४००००५ फॅक्स क्र. ०२२-२२१६३९७६, ई-मेल : ehearing@merc.gov.in / secretary@merc.gov.in यांना **२० एप्रिल, २०२२ पर्यंत** पाठवाव्यात.

४. इच्छुक व्यक्तिंनी आपल्या हरकती आणि सूचना इंग्रजी किंवा मराठीत २ प्रतींमध्ये पाठवाव्यात आणि त्यावर पाठविणाऱ्याने आपले पूर्ण नाव, पोस्टाचा आणि, ई-मेलचा पत्ता कळवावा. कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने हरकती पाठविण्यात येत असल्यास तसे त्यात नमूद करावे.

५. वरील परिच्छेद ४ नुसार, अभिप्राय/हरकती पाठविणाऱ्या प्रेषक / आक्षेपकाला त्याचे म्हणणे ई-सुनावणीमध्ये व्यक्तिश: मांडावयाचे असल्यास सूचना/हरकती दाखल करताना तसे विशेषत्वाने नमूद करावे. अशा प्रकरणी, वैध ई-मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक देणे अनिवार्य राहील. आयोग, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, अशा प्रेषक/आक्षेपकाला ई-सुनावणीमध्ये त्याचे म्हणणे मांडण्याची परवानगी देईल. जाहीर ई-सुनावणीत भाग घेणाऱ्या सर्व व्यक्ती आयोगाने **दि. १७ सप्टेंबर, २०२० रोजी** व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे जाहीर सुनावणीस हजर राहण्यासाठी अधिसूचित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील तरतुदींचे पालन करतील.

६. **दि. २२ एप्रिल, २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता** व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे ई-सुनावणी घेण्यात येईल. या प्रयोजनासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

**सही/-**

**(अभिजीत देशपांडे)**

**सचिव, मविनिआ**

ठिकाण : मुंबई ,

दिनांक : ३०/०३/२०२२